स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 01–06–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिति यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 79</u>:— प्रभाग क्र. ४४—अ अंतर्गत हसनबाग येथील रस्ते सिमेंट कॉंक्रिटचे बांधकाम करण्यास्तव रू. ३४,७१,२१९/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 80</u>:— शहर स्वच्छता आराखडयानुसार नागपूर शहरास उघडयावर शौचास जाणाऱ्या लोकांच्या समस्येतुन सोडविण्यासाठी (ओडीएफ) योजनेअंतर्गत नागपूर शहरात ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर सुलभ शौचालये बांधणे व त्याचे दिर्घकाळाकरिता संचालन, देखभाल व सुस्थिती राखणे हे काम करून घेण्यासाठी दोन अभिरूची प्रकटन (ई.ओ.आय.) (अभिरूची प्रकटन दि. 14. 03.2012 आणी अभिरूची प्रकटन—अतिरिक्त संधी दि. 16.08.2012) याद्वारा आमंत्रित सेवाभावी अशसकीय संस्थापैकी **परिशिष्ट 'अ'** मधील संस्थांना महानगरपालिकेत नामीत (Empanel) करणे तसेच उपरोक्त कामाकरिता विहीत प्रपत्रांसह म.न.पा. मधे नामीत (Empanel) करण्याकरिता विनंती अर्ज करणाऱ्या नवीन संस्थांची पात्रता तपासून कामाचे स्वरूपा नुसार त्यासंबंधातील अटी व शर्तीच्या अधिन राहून नामीत करण्यास व या संस्थांना स्थायी समितीच्या मान्यतेने काम वाटप करून सदर कामे या संबंधातील शासन निर्णयास अनुसरून करून घेण्यास मान्यता देणे त्याचप्रमाणे नागपूर शहरातील सर्व सुलभ शौचालयांच्या संचालनाच्या कामात सुसूत्रता आणणे व संस्थांचे उत्तरदायित्व निश्चीत करण्यासाठी त्यांच्या संचालनाबाबतच्या **परिशिष्ट 'ब'** मधील सुधारित करारनाम्यास मान्यता देण्याचा तसेच प्रचलीत शौचालय सेवाशुल्क दर (शौचाकरिता रू. 4/—, स्नानाकरिता रू. 5/—, मुतारी निःशुल्क आणी कौटुंबिक पास रू. 50/— प्रती कुटुंब/प्रती माह) यांस नियमानूकुल करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1) संस्था असमर्थ अथवा असफल असल्यास त्याचे काम काढुन घेवुन इतर संस्थेस प्रशासनास द्यावयाचे असल्यास स्थायी समितीची पुर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.
2) या प्रकल्पात इतर कोणत्याही पात्र संस्था काम करण्यास इच्छुक व समर्थ असल्यास त्या संस्थाचा समावेश करण्याचे अधिकार स्थायी समितीस राहील या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## <u>परिशिष्ट 'अ'</u>

**स्थायी समिती विषयाचे परिशिष्ट 'अ' :—** नामीत करण्यात आलेल्या संस्थांची यादी व त्यासंबंधातील अटी—शर्ती.

| अ. क्र. | सेवाभावी अशासकीय संस्थेचे नाव | कामाचे स्वरूप (गट) |
|---|---|---|
| 1 | सुलभ इंटरनॅशनल सोशल आर्गनायझेशन | |
| 2 | मेहतर समाज सर्वांगीण संस्था | |
| 3 | आदर्श ग्राम विकास संस्था, पारडी, हिंगणघाट, वर्धा | (अ) ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावरील सुलभ |

| | | |
|---|---|---|
| 4 | ओम शिवा सॅनिटेशन सोशल सर्व्हिस, सादिकाबाद कॉलोनी, मानकापूर, नागपूर | शौचालयाचे निर्माण करणे व त्याचे दिर्घकाळाकरिता संचालन, देखभाल व सुस्थिती राखणेचे काम करणे. |
| 5 | प्रगती सामाजिक विकास संस्था, मुंबई | |
| 6 | प्रो. शेख रमजान, मे. 786 कंस्ट्रक्शन, नागपूर | |
| 7 | संकल्प सोशल सर्व्हिस, वाशी, मुंबई | |
| 8 | मारोती बहुउद्‌देशीय शिक्षण संस्था, शांतीनगर, नागपूर | (ब) ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावरील सुलभ शौचालयाचे निर्माण करणे व त्याचे दिर्घकाळाकरिता संबंधीत अटी–शर्तीच्या अधीन राहुन संचालन, देखभाल व सुस्थिती राखणेचे काम करणे. |
| 9 | श्री. गणेश ग्रामीण शिक्षण संस्था, शांतीनगर, नागपूर | |
| 10 | भवानी महिला ग्राम विकास बहुउद्‌देशीय शिक्षण संस्था, 142, रेसिडेन्सी रोड, सदर, नागपूर | (क) ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावरील सुलभ शौचालयाचे संबंधीत अटी–शर्तीच्या अधीन राहुन निर्माण करणे व त्याचे दिर्घकाळाकरिता संचालन, देखभाल व सुस्थिती राखणेचे काम करणे. |
| 11 | वनिता बहुउद्‌देशीय शिक्षण संस्था, शांतीनगर, नागपूर | |
| 12 | महर्षि सुदर्शन बहुउद्‌देशीय सेवा सहकारी संस्था मर्या. नागपूर, लालगंज, सुदर्शन नगर, नागपूर | (ड) ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर सुलभ शौचालयाचे यासंबंधातील अटींचे अधिन राहून संचालन, देखभाल व सुस्थिती राखणेचे कार्य करणे. |
| 13 | वैष्णवी बहुउद्‌देशीय शिक्षण संस्था, नागपूर | |
| 14 | गौतम शहर व ग्रामीण विकास सोशल सर्व्हिस ऑर्ग. नागपूर | |
| 15 | स्टार सेक्युरिटी ॲण्ड हाउस किपींग सर्व्हिस, दिल्ली | |

1. संस्था अनक्रमांक 8, 9 या संस्थांची शौचालये निर्माण करण्याबाबतची तांत्रीक पात्रता आणी आर्थीक स्थिती चांगली असली तरी शौचालयांच्या दिर्घकाळ संचालनाचा व देखभाल आणी सुस्थिती राखण्याबाबतचा अनुभव व व्यवस्था कमकुंवत आहे. या संस्थांचा शौचालय निर्माण व संचालन यांचे संयुक्त काम देतांना संचालनातील अनुभवातील कमकुंवतपणामुळे विश्वसनियतेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याने त्यांचेबाबत संचालन कार्याचा किमान 10 वर्षाचा कालावधी पुर्ण होईपर्यन्त रू. 1.00 लाख सुरक्षा ठेव वसुल करण्यात यावी व संचालन कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण केल्यानंतर शौचालय युनिट मनपास हस्तांतरित करतांना शौचालय युनिटच्या सुस्थितीची शाहनिशा करून व आवश्यक असल्यास येणाऱ्या खर्चाचे आकलन करून तो खर्च वजा करता उर्वरित सुरक्षाठेव परत करण्यात यावी. यानंतर पुढील मुदत वाढीबाबत विचार करण्यात यावा. तसेच दरम्यानच्या काळात अशा संस्था संचालन कार्यात असफल अथवा असमर्थ ठरल्यास किंवा त्यांनी शौचालय युनिट मनपास समर्पित करण्याची इच्छा दर्शविल्यास किंवा इतर कोणत्याही कारणांनी त्यांचेकडुन संचालन कार्य काढुन घेणे मनपास आवश्यक वाटल्यास अशा संस्थांची सुरक्षाठेव जप्त करण्यात यावी. या अटींवर अशा संस्थांना शौचालय निर्माण करणे व संचालन करणे असे संयुक्त काम मोक्का उपलब्धतेनुसार व आवश्यकते नुसारदेण्यात येईल. उपरोक्त संस्था असमर्थ अथवा असफल असल्यास त्यांचे काम काढून घेवून इतर संस्थेस 6 महिण्याकरिता किंवा स्थायी समितीची मंजूरी प्राप्त होईपर्यंतच्या कालावधी यापैकी जो कमी असेल त्या कालावधी करिता मा. आयुक्तांचे मान्यतेने काम दिले जाईल.

2. त्याचप्रमाणे संस्था अनुक्रमांक 10, 11 या संस्थांचा शौचालय संचालन व देखभाल करण्याचा दिर्घानुभव असला तरी शौचालय व तत्सम इमारती निर्माण करण्याचा अनुभव नगण्य आहे. त्यामुळे या संस्थांना शौचालय निर्माण व संचालन असे संयुक्त काम देतांना त्यांनी कामाच्या एकुण खर्चाएवढ्या रकमेचा पुढाकार घेवुन काम

करावे व काम तांत्रिक दृष्टया समाधानकारक रित्या व यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर भुगतान करण्यात यावे या अटीवर शौचालय निर्माण व संचालन यांचे संयुक्त काम मोक्का उपलब्धते नुसार व आवश्यकते नुसार देण्यात येईल.

3. त्याचप्रमाणे संस्था अनुक्रमांक 12 ते 15 या सुलभ शौचालयांचे संचालन करण्यास इच्छुक असणाऱ्या संस्थांना संधी देणे व मनपाकडे अशा संस्था आकस्मिक प्रसंगाकरिता तयार ठेवून आवश्यकते प्रमाने संचालनाचे व देखभालीचे काम देण्यात येईल.

4. सर्व गटांतील नामीत संस्थांना त्यांच्या निर्धारित कामांसोबत शौचालयाचे निर्माण व संचालनाचे संयुक्त काम या संबंधातील अनु क्र. 1 व 2 मधील अटींचे अधिन राहून वाटप करण्यास स्थायी समितीने मान्यता दिल्यास अशा संस्थांनी किमान पात्रताचे निकष पूर्ण करण्यात आल्याचे गृहित धरण्यात येईल. किमान पात्रता धारण करेपर्यन्त संबंधीत अटी–शर्तीच्या अधिन राहुन स्थळांच्या उपलब्धतेनुसार त्या कामास स्थायी समितीची मंजुरी प्राप्तझाल्या नंतर काम करून घेण्यात येईल व संस्थांनी किमान पात्रता धारण केल्यानंतर संबंधीत अटी–शर्ती निरस्त करण्यात येतील.

ठराव क्रमांक 81:— स्थायी समिति ठराव क्र. 36 दिनांक 27.04.2015 अन्वये एकात्मिक रस्ते सुधारणा प्रकल्प (आयआरआयपी)–2015 करीता सिमेंट कॉक्रिट रस्त्यांच्या यादीला मान्यता प्रदान केलेली आहे. या सर्व रस्त्यांचे संकल्प चित्र (डीझाईन) तयार करण्यास्तव रस्त्यांचा प्लेन टेबल सर्व्हे करणे, ट्रॅफिक सर्व्हे करणे तसेच संकल्प चित्र व प्राकलन तयार करण्यासाठी निविदा पूर्व प्रक्रिया व निविदा नंतरची प्रक्रिया जसे– प्रकल्पाचे पर्यवेक्षण इत्यादीस्तव प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार (पी.एम.सी.) नेमणूक करणे आवश्यक आहे. करीता प्रकल्प अहवालास शासनाची मंजुरी प्रदान होईल या अटीचे अधीन राहून खालील प्रमाणे निविदा मागविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | विवरण | निविदा कालावधी |
|---|---|---|
| 1. | जीओटेक्नीकल सर्व्हे करिता निविदा प्रक्रिया करणे | 15 दिवस |
| 2. | प्लेन टेबल व ट्रॅफिक सर्व्हे करण्याकरीता निविदा प्रक्रिया करणे | 15 दिवस |
| 3. | समांतररित्या प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार नेमण्याकरीता निविदा बोलाविणे | 25 दिवस |

**ठराव क्रमांक 82** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर